# Fairy माई आजी

माई घाग ह्या माझ्या अमेरिकेतील सल्लागार, हितचिंतक, मैत्रीण व आई. माझ्या मुलींनी त्यांचं नाव कौतुकाने फेयरी fairy माई आजी असं ठेवलं आहे. माईच्या चौघी मुली अमेरिकेत असल्याने त्यांचा वेळ चार ठिकाणी विभागला जातो. आमच्या जवळच माईची एक मुलगी रहाते. माई तिथे असल्या की भेटायला म्हणुन आम्ही जातो. मग "राहा ग जेवायला" हा त्यांचा आग्रह ठरलेला. मुळीच आढेवेढे न घेता आम्हीही थांबतो आणि स्वयंपाकघरातून खरोखरच जादूची कांडी फिरवल्याप्रमाणे एकेक चविष्ट पदार्थ आमच्यासमोर हजर होतात. वालाचं बिरडं, कोलंबीचं कालवण,कोथिंबिरीच्या वड्या असल्या अनेक वेळखाऊ पदार्थानी भरलेलं ताट, बरोबरच वाफाळणारा भात व मऊ लुसलुशीत पोळी अशी मेजवानी असते. भातावर तुपाची धार घालत माई म्हणणार "आज तुमचं डायेट राहुद्या बाजूला." आणि अविनाशला उद्देशून त्यांची खास comment असतेच. "सिकेप्याला संतुष्ट केला."

माईचं खर नाव सरला घाग पण सर्व त्यांना माई म्हणूनच ओळखतात. माई व ती. भाई 35 वर्षांपूर्वी अमेरिकेत मुलीना मदत होईल म्हणून आले. नातवंडाना सांभाळणं ,मुलीना होईल तेवढी मदत करणं ह्यात त्यांचा वेळ आनंदात जायचा. आमच्यासारख्या मित्रमंडळीना पण त्यांचा मोठा आधार असायचा. भाईना जाऊन आता काही वर्ष झाली. भाईना इथे वाढणाऱ्या कर्तबगार मुलांचे खुपच कौतुक असायचं. मुलांची valedictorian म्हणुन पेपरात नावं आली किवा त्याना इतर प्रसिद्धी मिळाली की भाईचा आशिर्वाद पहिला असायचा. माईनी पण भाईच्या नंतर ही प्रथा चालू ठेवली आहे. माईच्या मुली , नातवंडं पण त्यांच्या व्यवसायात अतिशय कर्तबगार आहेत. त्याचं श्रेय माईना व भाईनाच द्यायला हवं.

माई नावाप्रमाणेच प्रेमळ पण अतिशय खंबीर आणि कर्तबगार आहेत. त्यांच्याशी 15 ते 20 मिनीटं नुसतं फोनवर बोललं तरी मन उत्साहाने भरून जातं. त्यांचं वय आता पंच्याहत्तरच्या पल्याड असलं तरी काल,परवा पर्यंतचा त्यांचा कामाचा झपाटा व उत्साह 25 च्या मंडळींच्या वरताण आहे. माईना खरं म्हणजे व्यवहारज्ञान व पाकशात्रात डब्बल Phd. द्यायला हवी. त्या हल्लीच्या काळात जन्मल्या असत्या तर celebrity म्हणून नक्किच चमकल्या असत्या. आता वयोमानाप्रमाणे माई जरा थकल्यात. पण गेले अनेक वर्ष ज्या भाग्यवंतानी माईच्या हातच्या पापुद्र्याच्या रंगीबेरंगी करंज्या, घरी केलेल्या खव्याचे गुलाबजाम, तोंडात विरघळणारे पेढे असे अनेक पदार्थ चाखले आहेत ते त्यांची चव कधीच विसरणार नाहीत. माईच्या नातिचं हल्लीच लग्न झालं. माई मला म्हणाल्या, "लग्ना आधी एके दिवशी सगळे बाहेर गेले होते, तेवढ्यात 3 तासात मी 500 पेढे केले. अगदी गुपचुप. मुली नंतर रागावल्या , एवढा खटाटोप केला म्हणून. पण मला त्यात खूप आनंद व समाधान मिळाले." लग्नातलं रुखवत, व्याही भोजनाचं पंचपक्वानाचं जेवण सगळं माईच्या देखरेखी खाली झालं. मदतीला हजर होती पण त्यातला सिंहाचा वाटा , योजना व संकल्प माईचाच.

माईच्या लाघवी स्वभावामुळे त्यांचा मित्रपरिवार जगभर पसरलेला आहे. माझ्या एका अमेरिकन मैत्रिणीने माईच्या मुलीकडून दोन, तीन वेळेला पार्टिचं जेवण करून घेतलं त्याला देखील आता वीस एक वर्ष झाली असतील. पण अजूनही ती माईची व भाईची आठवण काढते. त्याला कारण माईचं प्रसन्न आणि उत्साही व्यक्तिमत्व. एकदा जरी तुम्ही त्याना भेटलात तरी त्या तुमच्या कायमच्या लक्षात राहतील.

माईना बऱ्याच लोकानी गळ घातली. . माई तुम्ही पाककृतिचे पुस्तक का नाही लिहीत? भाईनी पण त्यांना प्रोत्साहन दिलं. अमेरिकेत माईचं स्वादिष्ट पुस्तक 1998 मध्ये प्रकाशीत झालं. अमेरिकेत राहणाऱ्या भारतियाना हे पुस्तक खूपच ऊपयुक्त आहे. कांदा तळून ziplock bags मध्य फ्रिझ करायचा, मसाल्याच्या क्युब्ज करायच्या. अश्या अनेक सूचना, टीपा त्यात आहेत. रिकोटा चीज , डब्यातले ट्युना फिश असे अमेरिकेतले सहज मिळणारे जिन्नस वापरून पदार्थ झट्पट तयार करता येतात. इथे राहणाऱ्या आपल्याच पुढच्या पिढीला उपयोगी पडेल म्हणून maai's recipe हे त्यांचं इंग्रजी भाषेतलं पुस्तक प्रकाशीत झालं. ह्या दोन्ही पुस्तकातून होणारा फायदा भारतातल्य गरजू संस्थाना माई देणगी म्हणून देतात.

माई वर्षातुन एकदा भारतात जातात. तिथे वांद्र्याला त्यांचं भाड्याचं घर आहे. माई गेल्या की घराच्या मालकिणीकडून तयार जेवण माईसाठी रोज येतं. माई म्हणाल्या माझ्या नंतर ती जागा मालकाला परत मिळणार. असे मालक, भाडेकरूंचे

सलोख्याचे संबंध हल्ली फारच विरळा . ह्याचं मुख्य कारण म्हणजे माई व भाईचा स्वभाव . सर्वांशी मिळून मिसळून वागायचं व त्याच बरोबर सचोटीने व्यवहार करायचा .

अश्या आमच्या माई म्हणजे काही आतलं बाहेरचं नसलेल्या, कष्टाळू, कर्तबगार ,आस्थेने मदतिचा हात पुढे करणाऱ्या आणि माझ्यासारख्या इथे स्थाईक झालेल्या अनेकांच्या अमेरिकेतल्या आई आहेत . लहान , मोठ्या गोष्टीतून माईच्या स्वभावाचे अनेक पापुद्रे ,अलगद उलगडतात अगदी त्यानी बनवलेल्या रंगीबेरंगी करंज्यांसारखेच !!!